वेचक

सानपाडा विभागात धुरीकरणाची भाजपतर्फे मागणी

नवी मुंबई (प्रतिनिधी) : सानपाडा सेक्टर २,३,४,५,६,७,८,९,११,३० आणि सानपाडा गावामध्ये धुरीकरण करण्याची लेखी मागणी भाजपचे

नवी मुंबई जिल्हा सचिव पांडुरंग आमले यांनी पालिका आयुक्त कैलाश शिंदे यांच्याकडे केली आहे. सानपाडा येथे डासांची समस्या वाढली आहे. डासांमुळे सकाळी व संध्याकाळी लोकांना दरवाजे-खिडक्या बंद करून घरात बसावे लागते. सोसायटी आवारात, उद्याने व अन्य सार्वजनिक ठिकाणी डासांमुळे फिरणे अवघड झाले आहे. पाऊस लांबल्याने डासांच्या घनतेतही वाढ झालेली आहे. साथीचे आजारही बळावले आहेत. पालिका प्रशासनाने डासांची समस्या नियंत्रणात आणण्यासाठी या परिसरातील अंतर्गत व बाह्य भागात तसेच गृहनिर्माण सोसायटीच्या अंतर्गतही धुरीकरण अभियान व्यापक प्रमाणावर व सातत्याने राबविण्याची मागणी आमले यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

विरंगुळा केंद्रामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृह बांधण्याची काँग्रेसची मागणी

नवी मुंबई (प्रतिनिधी) : नेरूळ सेक्टर ४ मधील पालिका उद्यानात निर्माणाधीन ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रामध्ये महिलांसाठी स्वतंत्र शौचालयाची निर्मिती करण्याची मागणी नवी मुंबई जिल्हा काँग्रेसच्या सचिव विद्या भांडेकर यांनी पालिका आयुक्तांकडे एका निवेदनातून केली आहे. येथे उद्यानात सकाळी व संध्याकाळी स्थानिक मोठ्या संख्येने चालणे व व्यायामासाठी येतात. विरंगुळा केंद्रात केवळ पुरुषांसाठी शौचालय आहे. उद्यानात येणाऱ्या महिलांची गैरसोय होऊ नये यासाठी ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रामध्ये महिलांसाठीही स्वतंत्र शौचालय असणे आवश्यक आहे. महिला व पुरुषांना एकच शौचालय असल्याने गैरप्रकार होण्याची भीती आहे असे निवेदनात म्हटले आहे.

सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीचे आंदोलन

२७ गावांच्या स्वतंत्र नगरपालिकेची मागणी

◆ कल्याण (प्रतिनिधी) :

२७ गावांच्या स्वतंत्र नगरपालिकेच्या मागणीसाठी सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीतर्फे आज कल्याण शिळफाटा रस्त्यावरील भागाशेठ वझे चौक भागात एकदिवसीय लाक्षणिक आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीचे अध्यक्ष खासदार सुरेश म्हात्रे, मुरबाड विधानसभेचे भाजप आमदार किसन कथोरे यांनी उपस्थित राहून पाठींबा दर्शविला. समितीचे उपाध्यक्ष सत्यवान म्हात्रे, सुमित वझे, रतन पाटील, रामचंद्र पाटील, शिवाजी माळी, मधुकर माळी, राहुल जाधव आदी पदाधिकारी आणि २७ गावांतील नागरिकांनी मानपाडा चौकात रास्तारोको करत स्वतंत्र नगरपालिकेची मागणी लावून धरली. शिवसेना (शिंदे गट) स्थानिक ज्येष्ठ पदाधिकारी मात्र सहभागी झाले नाहीत.

कडोंमपामध्ये असलेल्या २७ गावांमध्ये अनेक समस्या असून गावांमध्ये अजूनही एमआयडीसीचा पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे सातत्याने आंदोलन सुरू आहेत. तर दिवाबत्तीची सुविधादेखील केडीएमसीने पुरवली नाही. भाजप आ. किसन कथोरे यांनी सांगितले की, "गावकऱ्यांना स्वतंत्र असावं अशी मागणी ग्रामपंचायतीपासून होती. आता लोकसंख्या वाढली त्यामुळे या ग्रामपंचायतीची स्वतंत्र नगरपालिका करावी. २७ गावांना न्याय द्यावा ही मागणी राज्य सरकारला आहे. मुख्यमंत्र्यांना आज सकाळीच पत्र दिलेले आहे. संघर्ष समितीसोबत लवकर बैठक लावावी अशी विनंती केली आहे. खासदार सुरेश म्हात्रे हे स्वतः या आंदोलनात सहभागी झाले असल्याने लवकरच मुख्यमंत्री बैठक लावून याच्यातून मार्ग काढतील." असा विश्वास कथोरे यांनी व्यक्त केला.

खा. सुरेश म्हात्रे म्हणाले, "गेल्या अनेक दशकांपासून २७ गावांचा संघर्ष सुरू आहे. कडोंमपा स्वतःच्या क्षेत्रात विकास करू शकत नाही, तरीही २७ गावे बळकावण्याचा अट्टाहास करत आहे. ही भूमिका अन्यायकारक आहे. हा लढा केवळ २७ गावांचा नाही, तर प्रत्येक स्थानिक भूमिपुत्राच्या सन्मानाचा आहे. संघर्ष समिती सर्व पक्षांची असून २७ गावांना राज्यकर्ते न्याय देऊ शकले नाही तर त्यांचे अपयश आहे. " स्वतंत्र नगरपालिकेसाठी पुन्हा लाखोंनी जमा होऊ. निवडणूक लढवून ताकद दाखवा, निवडणूक लढवायची आणि जिंकायची असे आवाहन खासदार सुरेश म्हात्रे यांनी केले. या गावांबाबत निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र होईल असा इशारा म्हात्रे यांनी दिला.

दिव्यातील बेघरांचा पालिका मुख्यालयावर मोर्चा

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

दिवा येथील अनधिकृत बांधकामांवर ठाणे महापालिकेने कारवाईला सुरुवात केली आहे. या कारवाईमुळे बेघर झालेल्या नागरिकांनी शुक्रवारी ठाणे पालिका मुख्यालयावर मोर्चा काढला. संबंधित विकासकावर गुन्हा दाखल करून पुनर्वसनाची मागणी याप्रसंगी करण्यात आली आहे. सोमवारी दिव्यात कारवाईसाठी गेलेल्या पालिकेच्या पथकातील कर्मचाऱ्यांची नागरिकांसोबत बाचाबाची झाली होती. मंगळवारी रिकाम्या केलेल्या इमारतींवर आता तोडक कारवाई सुरू आहे. या सातही इमारतींमध्ये २७५ कुटुंबे राहण्यास होती.

यावेळी रहिवाशांनी महापालिकेचे अतिक्रमण नियंत्रण विभागाचे उपायुक्त उमेश बिरारी यांची भेट घेतली. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश असल्याने महापालिकेकडून या रहिवाशांना कोणतेही ठोस आश्वासन मिळाले नाही. या प्रकरणात विकासकावर गुन्हा दाखल करण्याची तयारी आता रहिवाशांनी सुरू केल्याचे समजते.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

क्र. : एस/एपी/ २०२५-२६ दिनांक : ०४.११.२०२५

नोव्हेंबर - २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या भंगार ई-लिलावाची अतिरीक्त तारीख

बीएसडी/रायपूर	बीएसपी/ विभाग	रायपूर/ विभाग	नागपूर/ विभाग	बीएसडी/ नागपूर
२४.११.२०२५	१९.११.२०२५	२०.११.२०२५	२१.११.२०२५	२८.११.२०२५

उप सामग्री व्यवस्थापक - II
दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, बिलासपुर

CPR/10/FL/436
South East Central Railway @secrail

कोपरीतील वीज तक्रार केंद्र स्थलांतरित केल्याने नागरिक संतप्त

३० वर्षांपासून कार्यरत केंद्र ठाण्याच्या पश्चिमेला हलवले

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

ठाणे (पूर्व) येथील कोपरी विभागातील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे वीज देयक तक्रार निवारण केंद्र गेली तब्बल तीन दशके नागरिकांसाठी अत्यंत सोयीचे ठरले होते. अलीकडेच हे केंद्र अचानक रहेजा गार्डन, ठाणे (प.) येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. त्यामुळे कोपरी विभागातील नागरिकांमध्ये संताप उसळला आहे. या निर्णयाविरोधात ठाणे पूर्व शिवसेनेने लेखी निवेदन देऊन केंद्र पुन्हा कोपरी येथे सुरू करण्याची मागणी केली आहे.

स्थानिक नागरिक आणि शिवसेनेचे पदाधिकारी यांनी सांगितले, "३० वर्षांपासून कार्यरत असलेले हे केंद्र सर्वसामान्य ग्राहक, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी मोठी सुविधा होती. ठाणे पश्चिमेला जाण्यासाठी वेळ, पैसा आणि श्रम लागतात. अनेक वृद्धांना फक्त तक्रार देण्यासाठी किंवा बिलाबाबत विचारण्यासाठी इतके अंतर पार करावे लागते."

कोपरी परिसरात राहणारे नागरिक दर महिन्याला वीजबिल, मीटर वाचन, तक्रार निवारण, वीजजोडणी व नामांतरणसारख्या कामांसाठी नियमितपणे या केंद्रात येत असत. मात्र केंद्र हलवल्यामुळे त्यांना ठाणे पश्चिमेतल्या गजबजलेल्या भागात जावे लागते. नागरिकांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, "जर प्रशासनाने नागरिकांच्या सोयीचा विचार करून हे केंद्र पुन्हा कोपरीत सुरू केले नाही, तर आम्ही तीव्र आंदोलन छेडू."

स्थानिक पातळीवर या विषयावर चांगलीच चर्चा रंगली असून, शिवसेनेच्या पुढाकारामुळे पुन्हा तक्रार निवारण केंद्र कोपरीत येईल असा विश्वास स्थानिकांना आहे. या संदर्भात महावितरण केंद्राशी संपर्क साधला असता, तिथल्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, केंद्र ठाणे पश्चिम येथे स्थलांतरित झाले असले तरी, नागरिकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेऊन, तक्रार निवारणासाठी कर्मचारी ठेवले जाणार आहेत.

> "कोपरी विभागातील हजारो वीजग्राहकांना या निर्णयामुळे मोठा त्रास होत आहे. हे केंद्र हलवण्यामागे कोणताही तर्क दिसत नाही. नागरिकांच्या हिताचा विचार करून ते पूर्वीच्या ठिकाणीच सुरू करण्यात यावं, हीच जनतेची मागणी आहे."
> - संतोष बोडके (शिवसेना विभाग प्रमुख ठाणे पूर्व)

दक्षिण रेल्वे

सालेम विभाग
वरी. विभागीय विद्युत अभियंता यांचे कार्यालय
इलेक्ट्रिक लोको शेड, इरोड
ई-निविदा सूचना

खालील कामांकरीता ऑनलाईन निविदा मागवित आहेत :

निविदा क्र.	एसए ए आरएस ईडी ओटी २५ २६ ११ दिनांक : ०५.११.२०२५
कामाचे वर्णन	विद्युत लोको शेड, दक्षिण रेल्वे, सालेम विभाग, इरोड येथे इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हच्या उपकरणे (छप्पर, सहायक मोटर्स, मुख्य कंप्रेसर्स, सहायक कंप्रेसर्स) यांच्या अन-लोडिंग, लोडिंगसाठी कामाचा करार करणे.

निविदेच्या संदर्भातील सर्व माहिती https://www.ireps.gov.in येथे उपलब्ध आहे.
वरीष्ठ विभागीय विद्युत अभियंता, रोलिंग स्टॉक, इरोड.

उथळसर आणि नौपाडा भागात सोमवारी पाणीपुरवठा बंद

ठाणे : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील उथळसर प्रभाग समिती अंतर्गत सिद्धेश्वर जलकुंभ येथे नवीन जलकुंभाचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामामुळे कोलबाड परिसरात पाणीपुरवठा करणारी मुख्य पाणीपुरवठा वाहिनीबाधित होत असल्याने ही जलवाहिनी स्थलांतरित करणे आवश्यक आहे. या जलवाहिनी स्थलांतराचे काम सोमवार १० नोव्हेंबर, रोजी करण्यात येणार आहे. त्यामुळे, १० नोव्हेंबर, रोजी स. ९ ते मंगळवार ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत असे एकूण २४ तास या जलवाहिनीवरील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.

या कालावधीत उथळसर प्रभाग समितीमधील सिद्धेश्वर तलाव परिसर, माता रमाबाई आंबेडकर नगर, गणेश वाडी, नितीन कंपनी, पाचपाखाडी, हंस नगर, सिंग नगर, खोपट, फ्लॉवर व्हॅली, शेलार पाडा, गोकुळदास वाडी, कोलबाड, गोकुळ नगर परिसर व नौपाडा प्रभाग क्षेत्रातील पाचपाखाडी, चंदनवाडी, पालिका मुख्यालय परिसर, चरई, धोबीआळी इ. भागात २४ तास पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहील. ११ नोव्हेंबर रोजी पुरवठा सुरळीत झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल, याची कृपया नागरीकांनी नोंद घ्यावी. पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे आवाहन ठामपालिने केले आहे.

मालमत्ता कर न भरल्यास मालमत्तांच्या जप्तीचा कडोंमपाचा इशारा

कल्याण : कल्याण-डोंबिवलीतील मालमत्ता कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या मिळकतधारकांविरुध्द पालिकेने कर वसुली मोहीम सुरू केली आहे. ज्यांनी अद्याप मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही अशा मिळकतींना जप्ती वॉरंटपूर्व सूचना बजाविण्यात आल्या आहेत. या कारवाईनंतर थकीत कराचा भरणा न झाल्यास जप्ती, अटकावणीची कारवाई करुन, मालमत्तांची लिलाव प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याचा इशारा कडोंमपाने दिला आहे. सन २०२५-२०२६ या वर्षातील मालमत्ता कराची बिले वाटप करण्यात आलेली आहेत. तसेच, ज्या मिळकतधारकांना अद्याप बिले मिळाली नसतील त्या मिळकतधारकांनी www.kdmc.gov.in या संकेतस्थळावरून बिले उपलब्ध करून घ्यावीत. नागरिकांना कराचा भरणा सुलभरित्या होण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. ऑनलाईन कराचा भरणा केल्यास २% भरीव सूट दिली आहे. मालमत्ता कराचा भरणा करून पालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन कडोंमपाने केले आहे.

मीरा-भाईंदरमध्ये ७१ बोअरवेल, ९ जणांवर कारवाई

पाणी माफियांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश

भाईंदर : मीरा-भाईंदरमध्ये अनधिकृत पाणी उपसा करणारी ७१ बोअरवेल केंद्र असून त्यातील पाणी महाग दराने विकले जात असल्याचे उघड झाले आहे. तहसीलदार कार्यालयाने त्यांना नोटीस बजावली असून त्यातील ९ जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या सर्व पाणी माफियांवर त्वरित गुन्हे दाखल करण्याचे आदेश राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

सर्वांना नोटीस बजावण्यात आली. त्यातील फक्त ९ जणांनी उत्तर दिले त्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. इतर ६२ जणांनी नोटीस गांभीर्याने घेतली नाही. बोअरवेलवर पुढील दोन दिवसात हँडपंप बसविण्याचे निर्देश संबंधित पालिका अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

भिवंडी-निजामपूर आणि कडोंमपात सामूहिक 'वंदे मातरम्' गीत गायन

◆ कल्याण (प्रतिनिधी) :

राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या निर्देशानुसार, 'वंदे मातरम्' गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त आज कडोंमपा आणि भिवंडी-निजामपूर शहर पालिका मुख्यालयात सामूहिक वंदे मातरम् गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कडोंमपा आयुक्त अभिनव गोयल, उपआयुक्त (माहिती व जनसंपर्क) वंदना गुळवे, सर्व विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर भिवंडी पालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर, उप-आयुक्त विक्रम दराडे यांच्या अध्यतेखाली अधिकारी -कर्मचारी तसेच प्रभाग समिती कार्यालय, शाळांमध्ये देखील सामुहिक गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी उपायुक्त (कर) बाळकृष्ण शिरसागर, जमील पटेल (शहर अभियंता), संदीप गाडेकर (वैद्यकीय आरोग्य अधिकारी), अजित महाडिक (सहा.आयुक्त निवडणूक), सचिन नाईक (अति. शहर अभियंता) व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.

कडोंमपा आयुक्त गोयल यांनी "'वंदे मातरम्'या गीतातील प्रत्येक शब्द भारत माता विषयी असलेल्या समर्पण, ऐक्य आणि राष्ट्रीय अभिमानाची अनुभूती देतो. हे गीत आपल्या संस्कृतीचे, इतिहासाचे आणि देशभक्तीच्या भावनेचे प्रतीक आहे."असे सांगितले. तसेच या गीताचा इतिहास, अर्थ आणि त्यामागील संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शाळांमध्ये विशेष उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे अशा सूचना दिल्या.

दि जम्मू अँड काश्मीर बँक लिमिटेड,
J&K Bank Serving To Empower
११५/२४, समर्थ वैभव बिल्डिंग, ऑफ न्यू लिंक रोड, ओशिवरा मिल्लत नगर सर्कल जवळ, अंधेरी (प), मुंबई.
सीआयएन: एल६५११०जेके१९३८एसजीसी००००४८

संदर्भ: जेकेबी/व्हीएआरएसयूए/२०२५-२६ दिनांक : २८.१०.२०२५

श्री. आकाश अशोक सिंग परमार एस/ ओ श्री. अशोक सिंग परमार येथे राहणारः सदनिका क्र. १४०५, १४ वा मजला, इमारत क्र. सी ४, अपना घर फेज III म्हणून ज्ञात असलेली इमारत, गाव घोडबंदर ठाणे ४०११०७.

विषय: सिक्युरिटीज अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा २००२) च्या कलम १३ (८) अंतर्गत कर्जदारांना देण्यात आलेल्या अधिकारांच्या अनुसार मालमत्ता सोडवण्यासाठी सूचना.

प्रिय महोदय/ महोदया

जसे की तुम्हाला माहित आहे की बँकेच्या प्राधिकृत अधिकारी ह्यांनी सिक्युरिटीज अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट, २००२ (ह्यानंतर कायदा असा संदर्भ असलेले) च्या कलम १३ (२) अंतर्गत मागणी सुचना ०३.०७.२०२५ रोजी तुमच्या सुरक्षित मतेच्या संदर्भात जी तुम्ही/ कर्जदाराद्वारे कर्ज सुविधेची हमी म्हणून जारी करण्यात आली होती.

त्यानंतर प्राधिकृत अधिकारी ह्यांनी कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत श्री. आकाश अशोक सिंग परमार एस/ ओ श्री. अशोक सिंग परमार येथे राहणारः सदनिका क्र. १४०५, १४ वा मजला, इमारत क्र. सी ४, अपना घर फेज III म्हणून ज्ञात असलेली इमारत, गाव घोडबंदर ठाणे ४०११०७ येथील मालमत्तेचा ०७.१०.२०२५ रोजी ताबा घेण्यात आला होता ज्याच्या सीमा खालील प्रमाणे आहेतः

पूर्व: खुली जमीन, पश्चिमः अंतर्गत रोड
उत्तरः बल्डिंग क्र. सी-३ आणि मीरा भाईंदर लिंक रोड,
दक्षिणः इमारत क्र. बी २ आणि एकूण मोजमाप १४.६५ चौ. मी. बिल्टअप क्षेत्रफळ (१७३.४६ चौ. फू) ज्याअर्थी तुम्ही कर्जदारांचे दायित्व कायद्याच्या कलम १३(२) आणि १३(४) अंतर्गत देण्यात आलेली सूचना प्राप्त झाल्यानंतर देखील निर्वाहन करू शकलेले नाहित. म्हणून बँक कायदा आणि नियमांच्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून देय रकमेच्या वसुलीसाठी विक्री प्रक्रिया सुरु करू इच्छित आहे.

तुम्हाला ह्याद्वारे ३०.०९.२०२५ अनुसार रु. २०,६३,३८२.७७/- (रुपये वीस लक्ष त्रेसष्ट हजार तीनशे ब्याऐंशी आणि सत्याहत्तर पैसे मात्र) आणि त्यावरील ०१.१०.२०२५ पासुनच्या व्याजाचा भरणा सदर सुचनेपासून ३० दिवसांच्या आत करण्याची मागणी करत आहेत. आणि जर असे न झाल्यास बँक थकीत रकमेच्या वसुलीसाठी गहाण मालमत्तेची विक्री करेल.

कृपया नोंद घेण्यात यावी कायदा आणि नियमावलीच्या अंतर्गत विक्री सुचना जारी केल्यापासून गहाण मालमत्ता सोडविण्याचे तुमचे अधिकार काढून घेण्यात आले आहेत.

प्राधिकृत अधिकारी, जे अँड के बँक लि.

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक
UJJIVAN
नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" खाली नमूद दिनांकला करण्यात येईल

अनु. क्र.	कर्ज खाते क्र./ शाखा	कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव	१३ (२) सूचना दिनांक/ एकूण देणी (रु. मध्ये) अनुसार	ताब्याचा दिनांक	राखीव मूल्य / अमानत रक्कम मध्ये / इतके आयएनआरमध्ये
1	4411210130000139 / 4411- कोपरखैरणे	१) कुंजन आत्माराम भगत, २) नीलिमा कुंजन भगत दोघेही येथे राहणारः खोली क्र. ०४, झीयौजी चरत चाळ, हरीग्राम पनवेल, रायगड महाराष्ट्र ४१०२०० आणि येथे देखीलः मु. जरूर ता. घाटंजी जरूर, राजुरवाडी घाटंजी, यवतमाळ महाराष्ट्र ४४५३०१	०६.०६.२०२२ २६.०५.२०२२ अनुसार रु. ११,५४,१६४/-	29.04.2025	Rs. 6,50,000/- / Rs. 65000/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव गुळसुंडे, तालुका – पनवेल जिल्हा रायगड, ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंडे येथे वसलेल्या घर क्र. ५२४ वर बांधण्यात आलेले "गणेश नगर" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या तळ मजल्यावरील ३१० चौ. मी. मोजमापाच्या निवासी सदनिकेच्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. १६ चा सर्व खंड आणि भूखंड. सीमाः- पूर्व- खुली जागा, पश्चिम- खुली जागा, दक्षिण -रस्ताव उत्तर- खुली जागा,				
2	4505210130000045 / 4505- विरार	१) ओमप्रकाश पप्पू गुप्ता, २) कमलावतीदेवी पप्पू गुप्ता, दोघेही येथे राहणारः गाळा क्र. ०१ तळ मजला, उदय नगर, साकीनाका, अंधेरी मुंबई ४०००७२	०८.०९.२०२१/ ११.०८.२०२१ अनुसार रु. ७,८५,०९९/-	25.01.2025	Rs. 7,46,000/- / Rs. 74,600/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव सलवाड तालुका आणि जिल्हा पालघर येथे वसलेल्या एकुण ४०९.५ चौ. फू. मोजमापाच्या जमिनीचा धारण केलेला एस. क्र. २३३, प्लॉट क्र. १ (जूना सर्वे क्र. ६७/२), प्लॉट क्र. २० वर बांधण्यात आलेल्या पूनम अपार्टमेंट, म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या ए विंगच्या तळ मजला, दुसऱ्या मजल्यावरील ३८५ चौ. फू. क्षेत्रफळाच्या सदनिका क्र. २०२ चा सर्व खंड आणि भूखंड ज्याची मालकी तुमची आहे. त्याशिवाय कर्जदार आणि सह-कर्जदाराच्या उपरोक्त नमूद कर्ज खात्यामधील मालकीची असलेली जंगम मालमत्ता आणि स्थावर मालमत्ता.				
3	4412210080000009 / 4412- ठाणे	१) संजय बापू सरोदे, २) सिंधू संजय सरोदे, दोघेही राहणार बालाजी टॉवर सदनिका क्र. ४०४, बी विंग, मुक्कम पोस्ट वरप गाव कल्याण मुरबाड रोड वरप ठाणे महाराष्ट्र ४२१३०१. आणि येथे देखीलः वॉर्ड क्र. ५, म्हारळ पाडा, वरप मयुरेश्वर बियर टुकानाजवळ, धरवाणी प्रकल्पाच्या समोर, ठाणे महाराष्ट्र ४२१३०१. २) येथे देखीलः भैया साहेब आंबेडकर नगर, हनुमान मंदिराजवळ, उल्हासनगर, ठाणे महाराष्ट्र ४२१००२	०६.०६.२०२२/ २६.०५.२०२२ अनुसार रु. ९,४३,२७५/-	11.04.2025	Rs. 4,50,000/- / Rs. 45,000/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव कांबा, तालुका आणि जिल्हा ठाणे येथे वसलेल्या जमिनीच धारान केलेला सर्वे क्र. १२२, हिस्सा क्र. २ वर बांधण्यात आलेल्या "आनंदीबाई कॉम्प्लेक्स" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या सी विंगमधील १६३ चौ. फू. बिल्टअप क्षेत्रफळ असलेल्या निवासी मालमत्तेच धारण केलेला गाळा क्र. ३ चा सर्व खंड आणि भूखंड. सीमाः पूर्व-तंत्रज्ञान अहवालानुसार, पश्चिम-तंत्रज्ञान अहवालानुसार, दक्षिण-तंत्रज्ञान अहवालानुसार, उत्तर-तंत्रज्ञान अहवालानुसार.				
4	4462210180000002 / 4462- कामोठे	१)पूषअडिवन सेल्व वेकर एस/ ओ सेल्वा वेकर, २) मैनत पूंडी डब्ल्यू/ ओ पूंडी, दोन्ही ३) पी मरीश्वरम एस/ ओ पूंडी, सर्व येथे राहणारः शांतालाम नगर आर क्र. १७ साई अपार्टमेंट विठ्ठल ठाणे-४००६०५. १) येथे देखीलः न्यू लक्ष्मी आर्ट, हॉकस क्र. ३८२, गल्ला क्र.११ मजला, ईम क्र. ए-२, जयराम कॉम्प्लेक्स कालवरगाव, भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र-४२१३०२. आणि येथे देखील ३१, मंगलम, कडलाडी तालुक, कडलाडी, रामनाथपुरम, तामिळनाडू - ६२३७०३. २) आणि ३) येथे देखील १/३०७, मेला थेर, कडलाई, कडलाडी, रामनाथपुरम, तामिळनाडू - ६२३७०३.	२५.१०.२०२३/ १९.१०.२०२३ अनुसार रु. १८,७४,३२३.९६/-	17.01.2025	Rs. 14,01,000/- / Rs. 1,40,100/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव वल, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे उप विभाग आणि उप नोंदणीकरण कार्यालय भिवंडी आणि विभाग आणि जिल्हा ठाणे आणि जिल्हा परिषद ठाणे येथे वसलेल्या जमिनीच धारण केलेला एस क्र. ७१, एच क्र. १/४ वर बांधण्यात आलेल्या "प्रीतेश कॉम्प्लेक्स" वल येथील इमारत क्र. बी-१ च्या दुसऱ्या मजल्यावील साधारणपणे २१५५ चौ. फू. बिल्टअप क्षेत्रफळ चे २००.२८ चौ. मी. किंवा साधारणपणे तितक्याच असलेल्या धारण केलेल्या प्रस्तावित बांधकामाच्या एफ.एस.आय. अधिकारांसह सर्व खंड आणि भूखंड. पूर्वाधीयान ह्यांच्या नावे असलेले.				

मालमत्ता (मत्ता) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ :: ११-११-२०२५ आणि २४-११-२०२५ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान
बोली आणि इठेच्या सादरीकरणासाठी दिनांक :: २७.११.२०२५ रोजी स. ११:०० वा ते सायं. ५:०० वा. दरम्यान
लिलावाचा दिनांक आणि वेळ :: २८-११-२०२५ रोजी स. ११:०० वा ते दु. २:०० वा. दरम्यान

इसारा रक्कम ठेव (इठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत),
बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल शायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१ (सर्व अनु. क्र. करीत)
संपर्क तपशीलः कृष्णा सिंग: ७७६७८४७५८४, भक्ती नेना : ९२२४७१४९४.)

अटी आणि शर्ती : ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.
१. प्रधिकृत अधिकारी यांच्या महितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची महिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची महिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्रधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पहाणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पहाणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः प्रभाकरन एम - (मो क्र ७५१८२८९७०९). इच्छूक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com ला भेट द्यावी आणि युजर आयडी